RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक ४३] गुरुवार, मार्च ३०, २०२३/चैत्र ९, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ११३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मार्च २०२३.

**वाचा :—** (१) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे आदेश, दिनांक ५ जानेवारी २०२३.

(२) राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे पत्र क्र. रासनिप्रा/कक्ष-११/कृउबास/जात वैधता प्रमाणपत्र/२४२२/२०२३, दिनांक २९ मार्च २०२३.

### आदेश

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि त्याखालील नियम १९६७ आणि महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम, २०१७.**

क्रमांक कृबास ०३२३/प्र.क्र. १३६/२१-स.—ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजीच्या आदेशानुसार राज्यातील निवडणुकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक ३० एप्रिल, २०२३ पर्यंत पूर्ण करणेबाबत आदेशित केले आहे. त्यामुळे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी आदेश पारीत करून राज्यातील निवडणुकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक २७ मार्च, २०२३ पासून सुरु केलेल्या आहेत. सदर निवडणूक कार्यक्रमानुसार दिनांक २७ मार्च, २०२३ ते दिनांक ३ एप्रिल, २०२३ या कालावधीत इच्छुक उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्र दाखल केली जाणार आहेत. तसेच प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननी दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजी होणार आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १३ (१) मधील तरतुदीनुसार संबंधित बाजार समितीच्या बाजार क्षेत्रात राहणारे १५ शेतकरी हे त्या बाजार समितीच्या बाजार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कृषि पतसंस्था सदस्य, बहुउद्देशीय सहकारी संस्था सदस्य व ग्रामपंचायत सदस्यांकडून निवडले जाणार आहेत. सदर १५ शेतकऱ्यांपैकी ११ शेतकरी हे सहकारी संस्थेचा मतदार संघ व ४ शेतकरी हे ग्रामपंचायतीचा मतदार संघातून निवडले जाणार आहेत. सहकारी संस्थेच्या मतदार संघात महिला प्रवर्गाकरिता २, इतर मागास प्रवर्गाकरिता १ आणि विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती प्रवर्गाकरिता १ जागा राखीव आहे. तसेच ग्रामपंचायतीचा मतदार संघात अनुसूचित जाती किंवा अनुसुचित जमाती प्रवर्गाकरिता १ आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गाकरिता १ जागा राखीव आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम, २०१७ चे नियम, २१ (३) मधील तरतुदीनुसार राखीव प्रवर्गातील व्यक्तीनी नामनिर्देशन पत्रासोबत स्वतः प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. त्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत मिळणेबाबतची विनंती प्राधिकरणाकडे होत आहे ;

ज्याअर्थी, जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता मुदत देण्याबाबतची तरतूद महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम, २०१७ या नियमात नमूद नाही. जात पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर साधारणपणे सहा महिन्यांचा कालावधी लागत असल्यामुळे नामनिर्देशन पत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास अडचणी निर्माण होत आहेत ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करून निवडून आल्यानंतरच्या दिनांकापासून बारा महिन्याच्या मुदतीच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५९ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम, २०१७ चे नियम २१ (३) मधील तरतुदीतून सूट देण्याबाबत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विनंती केली आहे ;

ज्याअर्थी, कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत शेतकऱ्यांना निवडणूक लढविण्याचा अधिकार देण्याबाबत सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी प्रकाशित करण्यात आला आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मधील कलम ५९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा व त्यासंदर्भात शासनास प्राप्त असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २१ (३) मधून शासन पुढील अटीच्या अधिन राहून सूट देत आहे :—

(१) व्यक्तिने नामनिर्देशन पत्रासोबत स्वतः प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

(२) व्यक्ती कृषि उत्पन्न बाजार समितीवर निवडून आल्यानंतरच्या दिनांकापासून बारा महिन्याच्या मुदतीच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करील याबाबतचे हमीपत्र देईल.

(३) कृषि उत्पन्न बाजार समितीवर निवडून आल्याच्या दिनांकानंतर बारा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल आणि ती सदस्य राहण्यास अपात्र ठरेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. सुग्रिव सं. धपाटे,**
शासनाचे सह सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.